# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे - ४११ ००१

फोन नं (०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी – sceapune@gmail.com

---

जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-३अ/ निवडणूक/ क व ड वर्ग/तालिका मार्गदर्शक सूचना/--------/२०१९ दि. /१२/२०१९
8339 2 DEC 2019

प्रति,
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था (सर्व),

**विषय :- "क" व "ड" वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी / प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका तयार करण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४, नियम ७५.
२.प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र.रासनिप्रा/कक्ष -५/ निनिअ नियुक्ती निकष/परिपत्रक/३४२९/ २०१९ दि. २८.०३.२०१९ चे शुध्दीपत्रक.
३.महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१९, नियम ७५

२/- राज्यातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळाच्या नियमीत निवडणूका, संचालक मंडळाच्या रिक्त पदांच्या निवडणूका व पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका घेण्याची जबाबदारी व अधिकार महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३कब अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास निहीत केलेले आहेत. सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ अंमलात आले आहेत. सदरच्या निवडणूक नियमातील नियम ४ अन्वये, निवडणूकीचे प्रयोजनार्थ 'अ', 'ब', 'क' व 'ड' असे सहकारी संस्थांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासंबंधी निवडणूक नियमातील नियम ७५ अन्वये तरतुद करण्यात आली आहे. 'क' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी तयार केलेल्या व राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने मान्य केलेल्या तालिकेवरील किंवा नियम ३ खंड (१) प्रमाणे राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नेमणूक करेल आणि संबंधीत निवडणूक निर्णय अधिकारी हे तालुका / प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांचे मान्यतेने लवकरात लवकर निवडणूक कार्यक्रम जाहिर करतील अशी तरतूद आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ७६ प्रमाणे "ड" वर्गाच्या सहकारी संस्थांचे निवडणूकांकरीतादेखील राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण प्राधिकृत अधिकाऱ्यांची (Authorised Officer) नेमणूक करेल अशी तरतूद आहे.

त्याअनुषंगाने राज्यातील प्रत्येक जिल्हयातील 'क' व 'ड' वर्गीकरणाच्या सहकारी संस्थांचे निवडणूकी करीता सहकारी संस्थांचे निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी तयार करावयाची आहे. (यामध्ये २५० किंवा २५० पेक्षा कमी सभासद असणा-या सहकारी गृहनिर्माण संस्थांचा समावेश नाही.) त्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबतच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे आहेत.

१. 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका तयार करण्याकरीता जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था / सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचे अध्यक्षतेखाली एकूण ३ सदस्यांचे छाननी समितीचे गठन करण्यात यावे. सदर समितीमध्ये दोन सहाय्यक / उपनिबंधक सहकारी संस्था यांचा समावेश करण्यात यावा. जिसनिअ कार्यालयातील निवडणूकविषयक कामकाज पाहणारे सहाय्यक निबंधक सहकारी संस्था हे सदर समितीचे सदस्य सचिव असतील.

२. सहकार खात्यातील कार्यरत अधिकारी / कर्मचारी :- प्राधिकरणाने निर्गमित केलेले परिपत्रक जा.क्र. ३४२९/२०१९ दि. २८.०३.२०१९ प्रमाणे 'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूकीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांचा सदर नामतालिकेत समावेश असावा. त्यांचेकडून स्वतंत्र अर्ज मागविण्याची आवश्यकता नाही.

३. इतर शासकीय विभागातील किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यरत अधिकारी / कर्मचारी :- वरीष्ठ लिपीक व त्या पेक्षा जादा दर्जा असलेला कर्मचारी यांचा नामतालिकेत समावेश असावा.

४. प्रमाणित लेखापरिक्षक :- प्रमाणित लेखापरिक्षक हा मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नामतालिकेवरील नोंदणीकृत व कार्यरत प्रमाणीत लेखापरीक्षक असावा.

५. वकील :- वकीलीची सनद प्राप्त झाल्यापासून वकील म्हणून प्रत्यक्षात किमान ५ वर्षे कामकाज केल्याचा अनुभव असलेले वकील यांचा समावेश सदरच्या नामतालिकेत करावा.

६. कोणत्याही शासकीय विभागातुन किंवा स्थानिक स्वराज्य संस्थेमधून सेवानिवृत्त झालेले / सहकारी संस्थांमधून सेवानिवृत्त झालेले अधिकारी / कर्मचारी :- वरीष्ठ लिपीक व त्या पेक्षा जादा दर्जा असलेला सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचारी यांचा तालिकेत समावेश असावा. सर्वसाधारण पणे वय वर्षे ६५ पेक्षा जादा नसावे.

७. सहकारी संस्थेतील कार्यरत अधिकारी / कर्मचारी :- सहकारी संस्थेतील अधिकारी / कर्मचारी म्हणून ५ वर्षे सेवा केलेली असावी. तसेच वरीष्ठ लिपीक व त्या पेक्षा जादा दर्जा असलेले अधिकारी/ कर्मचारी यांचा समावेश तालिकेत करावा.

८. प्राधीकरणाने यापूर्वी तयार केलेल्या नामतालिकेवरून कामचुकारपणा/कर्तव्यात कसूर किंवा अन्य तत्सम कारणामुळे नामतालिकेवरून काढून टाकण्यात आलेली कोणतीही व्यक्ती सदर नामतालिकेकरीता पात्र असणार नाही.

९. प्राधिकरणाने विहित केलेल्या नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घेऊन ते आवश्यक त्या माहितीसह परिपूर्ण भरून आणि त्यासोबत आवश्यक ते स्वसाक्षांकीत छायांकीत पुरावे जोडून विहीत मुदतीमध्ये सादर करणे अनिवार्य राहील. विहीत मुदतीमध्ये प्राप्त झालेले परिपूर्ण अर्जच नामतालिका तयार करण्याचे प्रयोजनार्थ विचारात घेण्यात येतील.

१०. सदरची नामतालिका दि. ०१/०१/२०२० पासून अंमलात येऊन दि. ३१/१२/२०२२ पर्यंत वैध असेल, सदरच्या मुदतीनंतर नामतालिकेस मुदतवाढ देण्याबाबत किंवा नव्याने नामतालिका तयार करण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधीकरणास आहेत.